सकाळ



पौड रस्ता : स्वच्छता अभियानात सहभागी झालेले रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी.

# राजगुरू विद्यालयातर्फे स्वच्छता अभियान

**पौड रस्ता, ता. ४ :** पंख व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयाच्या सहकार्याने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमास महापौर मुक्ता टिळक, क्विकहिल फाउंडेशनचे संचालक कैलास काटकर, अनुपमा काटकर, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, सिद्धार्थ शिरोळे, अभिनेते सिद्धेश्वर झाडबुके, स्मिता आपटे, मैथिली बंडी, राम म्हेत्रे, काळूराम पवार, जयश्री पाटील, मुख्याध्यापक शंकर शेटे, शारदा शेटे उपस्थित होते. शाळांगण समुपदेशकांनी स्वच्छता या विषयावर पथनाट्य सादर केले. सूत्रसंचालन कल्याणी भावड यांनी, तर अजय शिर्के यांनी आभार मानले.